

| वर्ष - 7 | अंक - 273 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- सर्फराझ खान भारतासाठी खेळणार
- रकुल प्रीत, जॅकी भगनानीचे खास लूक
- इंडिया आघाडीला आणखी धक्का
- जुन्या वाहनांना नवीन नंबर प्लेट!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 16 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# आरक्षणाबाबत सरकार असंवेदनशील!

## खासदार सुप्रिया सुळे यांची टीका : मनोज जरांगे-पाटील यांची फसवणूक झाली



**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**विविध समाजाच्या आरक्षणाच्या संदर्भात राज्य शासन असंवेदनशील आहे, मी स्वतः अनेकदा संसदेत याबाबत आवाज उठवला आहे, मात्र राज्य शासनाकडून कोणत्याही प्रकारची ठोस कृती केली जात नाही. २०० आमदार व 300 खासदार असलेल्या सरकारला आरक्षणाबाबत निर्णय घेणे अवघड नाही, अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे.**

तसेच, विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निर्णय हा आमच्यासाठी अपेक्षितच होता, आम्ही सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली असून न्यायालय याबाबत योग्य तो निर्णय घेईल, अशी अपेक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा काँग्रेस पक्षात विलीन होणार अशा बातम्या येत असल्याबद्दल विचारले असता त्या म्हणाल्या की, तुम्हाला तुमच्या माध्यमांची विश्वासार्हता जपायची असेल तर खात्री करूनच अशा प्रकारच्या बातम्या द्या, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन होणार यात कसलेही तथ्य नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे.



# उपक्रम महापालिका प्रशासनचा अन्
# उदो उदो भाजपा आमदारांचा!

## महापालिका शिक्षण विभागाला राजकीय हस्तक्षेपाचे ग्रहण




भाजपा आमदारांचा फ्लेक्स




महापालिका प्रशासनाचा फ्लेक्स

ग्राऊंड रिपोर्ट

### भाजपाचा प्रसिद्धीलोलूपपणा...

महापालिकेच्या 'जल्लोष शिक्षणाचा' उपक्रमांतर्गत दुर्गा टेकडी, निगडी-प्राधिकरण येथे पिंपरी-चिंचवड मनपा शाळांतील मुलांसाठी बाल चित्रकला स्पर्धा- २०२४ घेण्यात येत आहेत. त्याठिकाणी पालिका प्रशासनाने फ्लेक्सही उभारले आहे. याच आवारात याच स्पर्धेला 'नमो चषक-२०२४' बाल चित्रकला स्पर्धा अशी बॅनरबाजी आमदार उमा खापरे यांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. त्यामुळे स्पर्धा महापालिकेची आणि ब्रँडिंग भाजपाचे असे चित्र चव्हाट्यावर आले असून, यामुळे भाजपाचा प्रसिद्धलोलूपपणा उघड्यावर पडला आहे.

**। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी 'जल्लोष शिक्षणाचा' हा उपक्रम हाती घेतला आहे. त्याअंतर्गत विविध कार्यक्रम, स्पर्धा आणि कौशल्य विकासाचे उपक्रम घेतले जातात. मात्र, याच उपक्रमांच्या माध्यमातून भाजपाच्या विधान परिषद आमदार उमा खापरे यांची राजकीय 'चमकोगिरी' सुरू आहे. त्यामुळे बाल चित्रकला स्पर्धा 'जल्लोष शिक्षणाचा' उपक्रमांतर्गत आहेत, भाजपा पुरस्कृत 'नमो चषक' उपक्रमांतील आहेत, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**

जल्लोष शिक्षणाचा २०२४

### पिंपरी-चिंचवडकरांच्या डोळ्यांत धुळफेक, राजकीय अजेंडा

> महापालिका प्रशासनाचा खर्च आणि प्रचार भाजपाचा अशी परिस्थिती आहे. आयुक्त शेखर सिंह आणि प्रशासनाची भूमिका निंदनीय आहे. विद्यार्थ्यांशी निगडीत असलेल्या उपक्रमामध्ये राजकीय प्रचारासाठी खटाटोप करणे, आक्षेपार्ह आहे. याबद्दल आयुक्त आणि भाजपाच्या आमदारांनी शहरवासीयांची माफी मागावी.
>
> **- तुषार कामठे,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी शरद पवार गट.



वास्तविक, पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रशासकीय राजवट आहे. आयुक्त शेखर सिंह यांनी राज्य सरकारच्या निर्देशानुसार आणि स्वयंबुद्धीने काम करणे अपेक्षीत आहे. केवळ सत्ताधारी पक्षाचे आमदार म्हणून उमा खापरे यांना वेगळी वागणूक देणे, ही बाब अशोभनीय आहे. दुसरीकडे, देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची 'इमेज बिल्डिंग' साठी हाती घेतलेला भारतीय जनता पार्टी पुरस्कृत उपक्रम 'नमो चषक' आणि 'जल्लोष शिक्षणाचा' याचा काडीमात्र संबंध नाही. पण, तरीही संबंधित कंपनी आणि प्रशासनाला हातीशी धरुन हा कार्यक्रम 'नमो चषक'च्या नावाने खपवण्यात येत आहे.

विशेष म्हणजे, महापालिका 'जल्लोष शिक्षणाचा' उपक्रमावर खर्च करीत आहे. त्या खर्चात भाजपाच्या विधान परिषद आमदार उमा खापरे स्वत:चे आणि पक्षाचे 'ब्रँडिंग' करीत आहेत. यावर महापालिका प्रशासन "तोंड दाबून बुक्क्यांचा मार" अशा भूमिकेत का आहे? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

खासगी संस्थेच्या माध्यमातून जल्लोष शिक्षणाचा उपक्रम महापालिका प्रशासन राबवत आहे. त्यामुळे संबंधित संस्था हा उपक्रम त्यांच्या कार्य अहवालामध्ये नमूद करणार, हे निश्चित आहे. त्यासाठी निर्धारित खर्च महापालिका प्रशासन करणार आहे. आज झालेल्या कार्यक्रमासाठी सर्व सोयी-सुविधा महापालिका प्रशासनानेच पुरवल्या आहेत. महापालिकेचे विद्यार्थी, सर्व स्टाफ आणि स्वयंसेवक प्रशासनाचे आणि जाहिरातबाजी मात्र भाजपाच्या आमदारांची, अशी स्थिती आहे. राज्यात राष्ट्रवादी, भाजपा आणि शिवसेना अशा तीन पक्षांचे सरकार आहे. या तीनही पक्षांच्या स्थानिक नेत्यांनी महापालिका प्रशासनाचा कार्यक्रम आपल्या नावाने खपवल्याचा प्रयत्न केल्यास प्रशासन केवळ मूग गिळून गप्प बसणार आहे का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

महापालिका विकासकामे आणि प्रकल्पांसाठी श्रेयवाद सर्वश्रुत आहे. आता शिक्षण विभागातील उपक्रमांवर राजकीय व्यक्ती डल्ला मारत असतील, तर प्रशासक म्हणून शेखर सिंह आणि प्रशासनाने आपल्या कार्यपद्धतीबाबत आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे.

# महापालिकेची पुन्हा 'पे अँड पार्क' योजना

## नागरिकांचा विरोध तरीही प्रशासनाची तयारी

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नागरिकांचा विरोध असताना पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरात सशुल्क वाहनतळ (पे अँड पार्क) योजना सुरू केली. नागरिकांना विश्वासात न घेणे, महापालिका प्रशासनाचा अतिआत्मविश्वास, वाहतूक पोलिसांचे असहकार, वाहनचालकांचा अल्प प्रतिसादामुळे ही योजना गुंडाळण्याची नामुष्की प्रशासनावर ओढविली. आता महापालिका स्वतः ही योजना राबविणार आहे.**

1 जुलै 2021 पासून शहरातील प्रमुख रस्त्यांवर पे अँड पार्क योजना सुरू करण्यात आली. तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर हे त्यासाठी खूपच आग्रही होते. अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने ठेकेदाराचाही उत्साह मावळला. परिणामी, ही योजना शहरातील अनेक भागांतून गुंडाळण्यात आली. अखेर, ठेकेदाराने काम बंद करण्याबाबत आयुक्तांना पत्र पाठविले होते.

आता, महापालिका स्वतः ही योजना राबविणार आहे. त्यातून दरवर्षी कोट्यवधीचे उत्पन्न मिळणार असून, महापालिकेचे कर्मचारी त्यासाठी तैनात करण्यात येणार आहेत. हे काम क्षेत्रीय कार्यालयानुसार केले चालणार आहे. त्या संदर्भातील प्रस्ताव महापालिकेच्या वाहतूक नियोजन विभागाने केला आहे.

पे अँड पार्क योजना ठेकेदाराला यशस्वीपणे राबविता आली नाही. महापालिकेस दरमहा मोठे उत्पन्न मिळणार असल्याने महापालिका ही योजना स्वतः राबविणार आहे. त्यासाठी महापालिकेचे कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहे. त्यासंदर्भातील अहवाल तयार करून आयुक्तांसमोर मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.





## भूमिका

**उत्तर अटलांटिक करार संघटना अर्थात 'नाटो' किंवा 'नेटो' (नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन) या संघटनेच्या अस्तित्वाविषयी काही प्रश्न उपस्थित करून अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या जुन्या मतांना नवी फोडणी दिली आहे.**

पण यासाठी त्यांनी ज्या प्रकारचे शब्द वापरले, ते रशियासारख्या पुंड देशांचा आत्मविश्वास वाढवणारे ठरते.

# ट्रम्प यांच्या अज्ञानातील धोका!



डोनाल्ड ट्रम्प गांभीर्याने कधी बोलतात, संतापात कधी बोलतात आणि विनोदनिर्मिती म्हणून कधी बोलतात याविषयी नेमके सूत्र बांधता येत नाही. तरीदेखील अशी व्यक्ती जेव्हा अमेरिकेसारख्या जगातील सर्वशक्तिमान देशाच्या अध्यक्षपदावर एकदा असते आणि कदाचित पुन्हा निवडून येण्याची शक्यता असते, तेव्हा तिच्या काही मतांमुळे आणि संभाव्य धोरणांमुळे जग अधिक असुरक्षित होऊ शकते. अमेरिकेच्या इतिहासात कोणत्याही अध्यक्षाच्या माथी असे पातक लागलेले नाही. ट्रम्प बहुधा तो इतिहासच बदलू इच्छितात! पण ट्रम्प नेमके काय म्हणाले?साऊथ कॅरोलिना येथे गेल्या शनिवारी एका मेळाव्यात 'नाटोतील सदस्य स्वसंरक्षणासाठी पैसे देणार नसतील, तर त्यांचे काय वाट्टेल ते करायला मीच रशियाला प्रोत्साहित करेन!' त्यांना नेमके काय म्हणायचे होते हे पुरेसे स्पष्ट होत नाही. नाटोतील सदस्य देशांनी संरक्षण निधीमध्ये वाढ करायला हवी हे यापूर्वी इतरही अमेरिकी अध्यक्षांनी सांगितलेले आहे, पण त्या अध्यक्षांचा रोख या देशांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाशी संरक्षण खर्चाच्या गुणोत्तराकडे होता. हे प्रमाण दरदेशी दोन टक्के करायला हवे यावर नाटो देशांमध्ये गेली काही वर्षे खल सुरू आहे. या चर्चेने पुतिन यांच्या युक्रेनवरील दोन आक्रमणांनंतर (२०१४ आणि २०२२) गंभीर वळण घेतले. संरक्षणासाठी नाटोतील प्रमुख देशावर म्हणजे अमेरिकेवर अवलंबून राहण्याची सवय कमी केली पाहिजे असे थेट न म्हणता, फ्रान्सचे अध्यक्ष इमान्युएल माक्राँ यांनी मध्यंतरी युरोपसाठी स्वतंत्र आणि आत्मनिर्भर संरक्षण व्यवस्था विकसित करण्याची चर्चा केली होती. ट्रम्प यांचा तळतळाट हा 'नाटोतील प्राधान्याने युरोपीय देशांच्या संरक्षणासाठी आम्ही अमेरिकी पैसा का वापरायचा', या युक्तिवादाभोवती केंद्रित असतो. मागे अध्यक्ष असताना त्यांनी जर्मनीतून अमेरिकी फौजा माघारी बोलावण्याचा आदेश दिला होता. कारण तत्कालीन जर्मन चॅन्सेलर अँगेला मर्केल यांच्याशी त्यांचे पटत नव्हते. अशीच धमकी त्यांनी दक्षिण कोरियाबाबतही दिली होती.यात दोन मुद्द्यांवर ट्रम्प यांचे अज्ञान दिसून येते. नाटोचा सदस्य असताना अमेरिका अशा प्रकारची भाषा करू शकत नाही. कारण नाटो स्थापनेवेळच्या करारनाम्यात अनुच्छेद पाचचा उल्लेख सर्वाधिक महत्त्वाचा आहे. यातील तरतुदीनुसार, नाटोच्या एका सदस्य देशावरील हल्ला हा संपूर्ण संघटनेच्या सदस्य देशांवरील हल्ला मानला जातो आणि त्यास तशाच प्रकारे सामूहिक प्रत्युत्तर देणे अपेक्षित आहे. त्यामुळे ट्रम्प म्हणतात त्याप्रमाणे, नाटो सदस्यावर रशिया किंवा आणखी कोणाच्या हल्ल्यानंतर अमेरिका त्यास वाऱ्यावर सोडून देऊ शकत नाही किंवा अलिप्तही राहू शकत नाही. ट्रम्प यांची नाटोविषयीची मते नवी नाहीत आणि कदाचित त्यामुळेच अमेरिकी काँग्रेसने अलीकडे एक विधेयक संमत केले. त्यानुसार, सेनेटच्या संमतीशिवाय कोणत्याही अध्यक्षाला नाटोमधून माघार घेता येणार नाही.

दुसरा मुद्दा अमेरिकेवरील कथित आर्थिक बोज्याचा. नाटोमध्ये केवळ तीनच अण्वस्त्रसज्ज देश आहेत- अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स. यातही ब्रिटन व फ्रान्सकडील एकत्रित अण्वस्त्रांपेक्षा काही पटीने ती अमेरिकेकडे आहेत. आकारमान, अर्थव्यवस्थेची व्याप्ती आणि लष्करी बलाबल या सर्वच आघाड्यांवर अमेरिका इतर देशांच्या तुलनेत प्रचंड मोठा आहे. तरीही फारच थोड्या युरोपीय देशांच्या संरक्षणासाठी हा देश स्वत:हून खर्च करतो. इतर सर्व देशांना शस्त्रास्त्र सामग्री रीतसर विकली जाते आणि नाटोच्या हद्दीत तैनात अमेरिकी फौजांचा खर्चही यजमान देशच उचलतात. त्यामुळे 'आमच्या पैशावर त्यांचे संरक्षण' हा ट्रम्प यांचा दावा अज्ञानमूलकच. आजवर केवळ एकदाच अनुच्छेद पाच प्रत्यक्ष आचरणात आणले गेले होते. ती वेळ होती ९/११ हल्ल्यानंतरची आणि तो हल्ला अमेरिकेवर झाला होता! ट्रम्प यांना बहुधा हेही लक्षात नसावे!

## संपादकीय »

### फिटे अंधाराचे जाळे

***निवडणुकांवरील देणग्यांच्या अंधाराचे जाळे या आदेशांमुळे निश्चितच फिटेल. म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे त्रिवार अभिनंदन.***

सर्वोच्च न्यायालयाचे अभिनंदन करण्यास शब्द अपुरे ठरतील. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचुड यांच्या पाच जणांच्या घटनापीठाने सध्याची निवडणूक रोख्यांची पध्दत आजच्या ऐतिहासिक निर्णयात पूर्णपणे घटनाबाह्य ठरवली. या निर्णयाचे महत्व असाधारण आहे. ते विषद करण्याआधी निवडणुका आणि लोकशाहीवरील धनदांडग्यांची काळी सावली सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या निर्णयाने दूर होणार असल्याने आनंद, समाधान व्यक्त करणे कर्तव्य ठरते. भारतातील निवडणुका आणि त्यातील पैशाचा प्रभाव हे आपल्या व्यवस्थेतील भ्रष्टाचाराचे मुळ आहे. ही निवडणुकीय देवाण-घेवाण बव्हंश: रोखीतून होत होती. म्हणजे या पैशाचा हिशेब ना कोणी ठेवत असे ना तो मागता येत असे. हा सरळ सरळ भ्रष्टाचार होता. तो उखडून फेकण्याचा बहाणा करत विद्यमान सरकारने २०१७ साली निवडणूक रोख्यांची पध्दत आणली.

'सर नमस्कार, मी 'अबप' वाहिनीचा पत्रकार दिनू चहाबिस्कीटकर, आपण काल भाजप प्रवेशाच्या वेळी 'आदर्श हा राजकीय अपघात' असे 'गंभीर' विधान केले. त्यावरून शेकडो प्रेक्षकांनी हा अपघात नेमका कसा अशी विचारणा केली. याविषयी आपण सविस्तर सांगाल का?' प्रश्न ऐकताच ते हसून मोठ्या उत्साहाने बोलू लागतात...

# राज्यभराच्या प्रवासात अनेकांना 'लिफ्ट' दिली

'तो अशोकपर्वाचा काळ होता. सत्यसाईबाबाच्या कृपेने मी पदावर विराजमान झाल्यावर सारे सुरळीत सुरू होते. पक्षाने माझ्या हाती राज्याचे सुकाणू दिल्यामुळे मी निर्धास्त होऊन राज्यशकट हाकायला सुरुवात केली होती. कधी क्लच तर फारच कमी वेळा ब्रेकवर पाय देत माझे मार्गक्रमण वेगाची मर्यादा पाळून सुरू होते. एक दिवस 'सौ'ला घेऊन 'राज्यकारभारा'साठी बाहेर पडलो असताना मला आदर्श गृहनिर्माणच्या फायलीसंदर्भात फोन आला. सदनिकेसंदर्भात प्रकरण आहे हे 'सौ'ला कळताच तिने बेघर असलेल्या तिच्या आईसाहेबांसाठी एक घर हवेच असा धोशा लावला. क्षणभरासाठी पाय ब्रेकवर गेला पण सावध होत मी ॲक्सिलरेटरवर पाय ठेवत वेग वाढवला. बाहेरून येणाऱ्या प्रत्येकाला मुंबईत घर हवेसे वाटणे स्वाभाविक याची खात्री पटल्यावर मी थोडा वेग कमी करत एक सदनिका ठेवा असे निर्देश दिले. नंतर राज्यभराच्या प्रवासात मी अनेकांना 'लिफ्ट' दिली.



त्यातल्या काहींना सासू प्रकरण ठाऊक झाल्याने त्यांनीही सदनिका मागितली. एकसे भले दो' या युक्तीमुळे शकटातील गर्दी वाढली पण प्रवास अधिक सुखकर होत गेला. नंतर प्रत्येक वेळी मी शकट हाकत असतानाच आदर्शसंबंधी फोन येत गेले. तेव्हा हेही कळले की ही फाइल ज्या अधिकाऱ्यांकडे गेली, त्या प्रत्येकाने एक सदनिका मागितली. हा व्यवहार नियमानुसार पैसे भरून होत असल्याने मी निर्धास्त होत माझ्या 'विकासरथा'ची गती वाढवली. एकदा प्रवासात असताना इच्छुकांची गर्दी वाढल्याने 'आदर्श' इमारतीची उंची वाढवण्याच्या प्रस्तावावरसुद्धा मी डाव्या हाती सुकाणू धरून स्वाक्षरी केली. पण पक्षातील काही असंतुष्ट तसेच विरोधकांना विकासाचे हे 'आदर्शपर्व' सहन झाले नाही. त्यांनी माझ्या गतीला बातम्यांचे ब्रेकर लावणे सुरू केले. तरीही मी शकट जोरात दामटणे सुरूच ठेवले. मग विरोधकांनी प्रवासात मोर्चारूपी बाधा आणली. कुणालाही इजा न होऊ देता मी 'विकास प्रवास' सुरूच ठेवला. या प्रवासातच मी बातम्या ऐकायचो पण चित्त विचलित होऊ दिले नाही. अखेर एक दिवस मला श्रेष्ठींचा फोन आला व पायउतार होण्यास सांगताच माझे नियंत्रण सुटले व शकट एका झाडावर जाऊन आदळले. त्यात मला अजिबात दुखापत झाली नाही. तेव्हापासून सारे या दुर्घटनेला आदर्श राजकीय अपघात म्हणू लागले. हा घटनाक्रम लक्षात घेऊनच मी काल तसे म्हणालो. त्यामुळे आता भाजपकडे मागणी करणार आहे की हा खटला भ्रष्टाचार प्रतिबंधकऐवजी मोटर वाहन कायद्यानुसार चालवावा.' हे ऐकताच मुलाखतकर्त्या दिनूचा जबडा बराच काळ बोनेट उघडलेल्या वाहनासारखा आ वासलेला राहिला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# जुन्या वाहनांना नवीन नंबर प्लेट!

## नंबर प्लेट बंधनकारक! लवकरच अंमलबजावणी सुरू होणार

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**देशभरात एप्रिल २०१९ नंतर नवीन वाहनांना उच्च सुरक्षा क्रमांक पाट्या (हाय सिक्युरिटी नंबर प्लेट) बंधनकारक करण्यात आल्या. त्यानंतर केंद्र सरकारने जुन्या वाहनांनाही या क्रमांक पाट्या बंधनकारक केल्या आहेत. त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राज्य सरकारकडे आहे. त्यामुळे परिवहन आयुक्त कार्यालयाने राज्य सरकारला याबाबत प्रस्ताव पाठविला असून, लवकरच त्यावर निर्णय अपेक्षित आहे.**




केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने डिसेंबर २०१८ मध्ये वाहनांसाठी उच्च सुरक्षा क्रमांक पाट्या बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाची अंमलबजावणी एप्रिल २०१९ पासून नवीन वाहनांसाठी सुरू झाली. नव्या वाहनांना उत्पादकांनी किंवा वितरकांनी या पाट्या बसवून देणे बंधनकारक करण्यात आले. केंद्र सरकारने जुन्या वाहनांनीही उच्च सुरक्षा क्रमांक पाट्या बंधनकारक केल्या आहेत. प्रत्येक राज्याने याची अंमलबजावणी करावयाची आहे. परिवहन आयुक्त कार्यालयाने राज्य सरकारला याबाबत प्रस्ताव पाठविला आहे. यावर लवकरच निर्णय होणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.गुन्हेगार गुन्हा केल्यानंतर पोलिसांपासून पळ काढण्यासाठी वाहन क्रमांकाच्या पाट्यांमध्ये बदल करतात. क्रमांक बदलल्यामुळे अनेकदा वाहने सापडत नाहीत. त्यामुळे गुन्हेगारही हाती येत नाहीत. या प्रकारांना उच्च सुरक्षा क्रमांक पाट्या बंधनकारक करण्यात आल्या. या पाट्यांमध्ये बदल करणे शक्य नसल्याने एकप्रकारे वाहनांचा गुन्हेगारी वापर करण्यावर अंकुश ठेवता येईल, असा प्रयत्न होता. याला यश आल्याने जुन्या वाहनांनाही या पाट्या बंधनकारक केल्या जाणार आहेत. याबाबतची निविदा प्रक्रियाही राबविण्यात आली आहे, असे सूत्रांनी स्पष्ट केले. उच्च सुरक्षा क्रमांक पाटी ही थ्रीडी होलोग्राम स्टीकर असते. त्यावर वाहनाच्या इंजिनाचा क्रमांक आणि वाहनाचा सांगाडा क्रमांक असतो. या पाट्यांमध्ये बदल करता येत नाही आणि त्यांचा आकारही बदलता येत नाही. या पाटीवर बारकोड असून, आरटीओ किंवा वाहतूक पोलिसांनी स्कॅन केल्यास वाहनाबाबतची संपूर्ण माहिती मिळते. पाटीवर एक इलेक्ट्रॉनिक चिप आणि गोपनीय क्रमांक असतो, तो वाहनाशी जोडलेला असतो. हा गोपनीय क्रमांक एकदा वाहन पाटीशी जोडला गेल्यानंतर दोन्ही बाजूने लॉक होतो. त्यानंतर कोणीही ते लॉक उघडू शकत नाही. या पाट्या ॲल्युमिनिअम मिश्र धातूपासून बनवलेल्या असतात. परिवहन आयुक्त कार्यालयाने राज्य सरकारला याबाबत प्रस्ताव पाठविला आहे. यावर लवकरच निर्णय होणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.गुन्हेगार गुन्हा केल्यानंतर पोलिसांपासून पळ काढण्यासाठी वाहन क्रमांकाच्या पाट्यांमध्ये बदल करतात. क्रमांक बदलल्यामुळे अनेकदा वाहने सापडत नाहीत. त्यामुळे गुन्हेगारही हाती येत नाहीत. क्रमांक पाट्या बंधनकारक करण्यात आल्या. या पाट्यांमध्ये बदल करणे शक्य नसल्याने एकप्रकारे वाहनांचा गुन्हेगारी वापर करण्यावर अंकुश ठेवता येईल, असा प्रयत्न होता. यश आल्याने जुन्या वाहनांनाही या पाट्या बंधनकारक केल्या जाणार आहेत.

### लवकरच निर्णय अपेक्षित

» याबाबतची निविदा प्रक्रियाही राबविण्यात आली आहे, असे सूत्रांनी स्पष्ट केले.उच्च सुरक्षा क्रमांक पाटी ही थ्रीडी होलोग्राम स्टीकर असते. त्यावर वाहनाच्या इंजिनाचा क्रमांक आणि वाहनाचा सांगाडा क्रमांक असतो. या पाट्यांमध्ये बदल करता येत नाही आणि त्यांचा आकारही बदलता येत नाही. या पाटीवर बारकोड असून, आरटीओ किंवा वाहतूक पोलिसांनी स्कॅन केल्यास वाहनाबाबतची संपूर्ण माहिती मिळते. पाटीवर एक इलेक्ट्रॉनिक चिप आणि गोपनीय क्रमांक असतो, तो वाहनाशी जोडलेला असतो. हा गोपनीय क्रमांक एकदा वाहन पाटीशी जोडला गेल्यानंतर दोन्ही बाजूने लॉक होतो. त्यानंतर कोणीही ते लॉक उघडू शकत नाही. या पाट्या ॲल्युमिनिअम मिश्र धातूपासून बनवलेल्या असतात. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने डिसेंबर २०१८ मध्ये वाहनांसाठी उच्च सुरक्षा क्रमांक पाट्या बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाची अंमलबजावणी एप्रिल २०१९ पासून नवीन वाहनांसाठी सुरू झाली. देशभरात एप्रिल २०१९ नंतर नवीन वाहनांना उच्च सुरक्षा क्रमांक पाट्या (हाय सिक्युरिटी नंबर प्लेट) बंधनकारक करण्यात आल्या. त्यानंतर केंद्र सरकारने जुन्या वाहनांनाही या क्रमांक पाट्या बंधनकारक केल्या आहेत. त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राज्य सरकारकडे आहे. त्यामुळे परिवहन आयुक्त कार्यालयाने राज्य सरकारला याबाबत प्रस्ताव पाठविला असून, लवकरच त्यावर निर्णय अपेक्षित आहे.

# ५० किलो चांदी चोरून पेढीतील व्यवस्थापक पसार

## सराफी पेढीवर प्राप्तीकर विभागाचा छापा पडणार असल्याची बतावणी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सराफी पेढीवर प्राप्तीकर विभागाचा छापा पडणार असल्याची बतावणी करून पेढीतील व्यवस्थापकाने पाच किलो सोन्याचे दागिने, ५० किलो चांदी, रोकड असा दोन कोटी २७ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. याप्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात पसार झालेल्या व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



विनोद रमेश कुलकर्णी (वय ३५, रा. लोणी काळभोर) असे गुन्हा दाखल आलेल्या व्यवस्थापकाचे नाव आहे. याबाबत ज्योतीरादित्य उर्फ यश राजेंद्र मोकाशी (वय २२, रा. निलगिरी लेन, बाणेर रस्ता, औंध) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना १२ मार्च २०२२ ते ८ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत घडली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी ज्योतिरादित्य मोकाशी यांचे वडील राजेंद्र मोकाशी सहायक पोलीस आयुक्त आहेत. यश यांनी दोन वर्षांपूर्वी हडपसर परिसरातील माळवाडी परिसरात वसुंधरा ज्वेलर्स सराफी पेढी सुरू केली होती. आरोपी विनोद कुलकर्णी सराफी पेढीत व्यवस्थापक होता. त्यावेळी सराफी पेढीत दागिने घडविण्यासाठी पाच किलो सोने आणि ८५ किलो चांदी खरेदी करण्यात आली होती. यश यांनी सोने, चांदी व्यवस्थापक विनोद कुलकर्णी याला दिली होती. त्यानंतर यश उच्चशिक्षणासाठी लंडनला गेले, शिक्षण पूर्ण झाल्यानंतर यश डिसेंबर २०२३ मध्ये पुण्यात आले. त्यांनी पुन्हा सराफी पेढीचे काम पाहण्यास सुरुवात केली.दागिने घडविण्यासाठी पाच किलो सोने आणि ८५ किलो चांदी खरेदी करण्यात आली होती. यश यांनी चौकशी केली. तेव्हा पावणेतीन किलो सोने आणि ५० किलो चांदी कमी असल्याचे लक्षात आले. यश यांनी याबाबतची माहिती सहायक पोलीस आयुक्त असलेले वडील राजेंद्र मोकाशी यांना दिली. कुलकर्णीकडे विचारणा करण्यात आली.

### 27 लाख रुपयांची फसवणूक

» तेव्हा ७ फेब्रुवारी रोजी सर्व सोने आणि चांदी परत करतो, असे सांगितले. त्यानंतर ८ फेब्रुवारी रोजी कुलकर्णीने सकाळी दहाच्या सुमारास सराफी पेढीतील कर्मचाऱ्याच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. सराफी पेढीवर प्राप्तीकर विभागाचा छापा पडणार असल्याची बतावणी केली. सराफी पेढीच्या मालकांना हिशेब द्यायचा आहे. त्यानंतर सकाळी साडेदहाच्या सुमारास एक मोटार आली. सराफी पेढीतील कर्मचाऱ्यांनी कुलकर्णी याच्याकडे सोने आणि चांदी दिली. कुलकर्णीने सराफी पेढी बंद करण्यास सांगितले. कुलकर्णीने पाच किलो सोने, ५० किलो चांदी, रोकड अशी दोन कोटी २७ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे यश यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक महेश कवळे तपास करत आहेत.


# इंडिया आघाडीला आणखी धक्का

## फारुख अब्दुल्ला जम्मू-काश्मीरमध्ये स्वबळावर

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारचा पराभव करण्यासाठी काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडीने २६ पक्षांची मोट बांधली होती. या आघाडीला इंडिया आघाडी असे नाव देण्यात आले. मात्र लोकसभा निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वीच जागा वाटपाच्या मुद्द्यावरून इंडिया आघाडीतील मतभेद उघड होत आहेत. नितीश कुमार यांच्या जनता दल (युनायटेड) पक्षाने बिहारमध्ये थेट भाजपाबरोबर सरकार स्थापन करून आघाडीला पहिला धक्का दिला. त्यानंतर ममता बॅनर्जी आणि अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेसशी जागावाटपावरून मतभेद असल्याचे उघड केले. त्यानंतर आता जम्मू आणि काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्स या पक्षानेही स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याची घोषणा केली आहे.**




नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे प्रमुख फारूख अब्दुल्ला यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेऊन आगामी लोकसभा निवडणुकीत त्यांचा पक्ष स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याचे सांगितले. तसेच लोकसभा निवडणुकीबरोबरच जम्मू आणि काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकांचीही घोषणा होण्याची शक्यता आहे, असेही ते म्हणाले. पत्रकार परिषदेत बोलत असताना अब्दुल्ला म्हणाले, "जागावाटपाचा प्रश्नच येत नाही, नॅशनल कॉन्फरन्स पक्ष निःसंशय स्वबळावर निवडणूक लढविणार आहे.या महिन्याच्या सुरुवातीलाच पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी पंजाबमध्ये आप स्वबळावर निवडणूक लढणार असल्याचे सांगितले. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्यातील जागावाटपाबाबत काँग्रेसशी कोणतीही चर्चा होणार नसल्याची घोषणा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी भगवंत मान यांनी स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले होते. फारूख अब्दुल्ला यांनी नुकतीच इंडिया टुडे वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. या मुलाखतीत फारूख अब्दुल्ला म्हणाले की, इंडिया आघाडीतील जागावाटपाची चर्चा निष्फळ ठरलेली आहे. त्यामुळे आम्ही स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेत आहोत, असे फारूख अब्दुल्ला यांनी जाहीर केले होते. तसेच एनडीए आघाडीत परतण्याच्या प्रश्नावर त्यांनी स्पष्ट भूमिका मांडली नाही. तसेच याचा विरोधही केला नाही. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात नॅशनल कॉन्फरन्स पक्ष एनडीएचा घटक पक्ष होता.मागच्या महिन्यात नॅशनल कॉन्फरन्सचे काही महत्त्वाचे नेते यांनी भाजपामध्ये प्रवेश केला होता. त्या पार्श्वभूमीवर फारूख अब्दुल्ला यांनी मोठा निर्णय घेतल्याचे मानले जाते. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि नॅशनल कॉन्फरन्स या पक्षांनी प्रत्येकी तीन जागा जिंकल्या होत्या.भाजपा सरकारने २०१७ साली निवडणूक रोख्यांची संकल्पना मांडून २०१८ पासून ही योजना कार्यान्वित केली होती. या योजनेअंतर्गत आजवर हजारो कोटींचा निधी राजकीय पक्षांना मिळाला. या योजनेअंतर्गत कोणत्याही व्यक्तीला, समूहाला किंवा कंपनीला राजकीय पक्षांना निधी देता येत होता. तसेच हा निधी कुणी, कोणत्या पक्षाला दिला? याचीही ओळख उघड केली जात नव्हती. त्यामुळे या योजनेच्या माध्यमातून राजकीय पक्षांना गेल्या काही वर्षात हजारो कोटींचा निधी प्राप्त झाला. मात्र आता सर्वोच्च न्यायालयाने ही योजना असंवैधानिक असल्याचा ठपका ठेवून स्टेट बँक ऑफ इंडियाला निवडणूक रोख्यांची विक्री थांबविण्याचे आदेश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर काँग्रेसने भाजपावर शरसंधान साधले आहे.ही योजना अमलात आल्यापासून काँग्रेसने त्यावर टीका केली होती. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी २०१९ साली एक्स अकाऊंटवर याविरोधात आवाज उचलला होता. आपल्या एक्स अकाऊंटवर राहुल गांधी यांची जुनी पोस्ट शेअर करत त्यांचा आरोप दूरदर्शीपणा दाखविणारा होता, अशी टिप्पणी केली आहे. स्वतः राहुल गांधी यांनीही एक्स अकाऊंटवरुन भाजपावर निशाणा साधला."नरेंद्र मोदी यांच्या भ्रष्ट कारभाराचा आणखी एक पुरावा आपल्या समोर आला आहे.

### पंतप्रधान मोदींची भ्रष्ट योजना

» भाजपा सरकारने २०१७ साली निवडणूक रोख्यांची संकल्पना मांडून २०१८ पासून ही योजना कार्यान्वित केली होती. या योजनेअंतर्गत आजवर हजारो कोटींचा निधी राजकीय पक्षांना मिळाला. या योजनेअंतर्गत कोणत्याही व्यक्तीला, समूहाला किंवा कंपनीला राजकीय पक्षांना निधी देता येत होता. तसेच हा निधी कुणी, कोणत्या पक्षाला दिला? याचीही ओळख उघड केली जात नव्हती. त्यामुळे या योजनेच्या माध्यमातून राजकीय पक्षांना गेल्या काही वर्षात हजारो कोटींचा निधी प्राप्त झाला. मात्र आता सर्वोच्च न्यायालयाने ही योजना असंवैधानिक असल्याचा ठपका ठेवून स्टेट बँक ऑफ इंडियाला निवडणूक रोख्यांची विक्री थांबविण्याचे आदेश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर काँग्रेसने भाजपावर शरसंधान साधले आहे.ही योजना अमलात आल्यापासून काँग्रेसने त्यावर टीका केली होती. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी २०१९ साली एक्स अकाऊंटवर याविरोधात आवाज उचलला होता. आज काँग्रेसने आपल्या एक्स अकाऊंटवर राहुल गांधी यांची जुनी पोस्ट शेअर करत त्यांचा आरोप दूरदर्शीपणा दाखविणारा होता, अशी टिप्पणी केली आहे.भाजपा सरकारने २०१७ साली निवडणूक रोख्यांची संकल्पना मांडून २०१८ पासून ही योजना कार्यान्वित केली होती.

# उद्धव ठाकरे आणि भाजपाची जुनी मैत्री : देवेंद्र फडणवीस

## भारतीय जनता पार्टी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेशी युती करणार?

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी देशभर मोर्चेबांधणी करत आहे. विरोधी पक्षांमधील अनेक नेत्यांनी गेल्या काही महिन्यांमध्ये भाजपात प्रवेश केला आहे. तसेच अनेक लहान-मोठे पक्ष एनडीएत सहभागी झाले आहेत. त्यामुळे देशात एनडीएची ताकद वाढू लागली आहे.**

बिहारमधील भाजपाचे जुने सहकारी नितीश कुमारही एनडीएत परतले आहेत. दोन दिवसांपूर्वी ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केला आहे. दरम्यान, आता महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेशी युती करणार का? असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. संयुक्त शिवसेना आणि भाजपाची तीन दशकांहून अधिक काळ युती होती. आता शिवसेनेचा शिंदे गट एनडीएचा सदस्य आहेत. अशातच उद्धव ठाकरे एनडीएत परतणार असतील तर भाजपा त्यांचं स्वागत करेल का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यावर




उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं आहे.उद्धव ठाकरे आणि भाजपाची जुनी मैत्री आहे. हे दोन मित्र पुन्हा एकत्र येतील का? यावर वेगवेगळे तर्कवितर्क लावले जात आहेत. या चर्चेवर देवेंद्र फडणवीस म्हणाले, "उद्धव ठाकरे आमच्याबरोबर येण्याची कुठलीही शक्यता नाही. याचं कारण असं आहे की, उद्धव ठाकरे यांनी आमच्यासाठी दारं बंद केली आहेत. केवळ दारं बंद केली नाहीत तर आमची मनं दुरावली आहेत. राजकारणात प्रत्येक व्यक्तीचं आणि पक्षाचं राजकीय धोरण असतं. तुमचं आणि माझं धोरण वेगळं असू शकतं. अनेकवेळा एखाद्या गोष्टीवर राजकीय मतभेद होतात. ते मतभेद दूर करून एकत्र येणं शक्य असतं. परंतु, इथे (भाजपा-उद्धव ठाकरे) मात्र परिस्थिती तशी नाही.

### राज ठाकरे यांच्याशी मैत्री

» देवेंद्र फडणवीस म्हणाले, भाजपा-उबाठा सेनेबद्दल बोलायचं झाल्यास इथे आताची परिस्थिती अशी आहे की आमची मनं दुखावली आहेत. उद्धव ठाकरे यांचा आमच्याबरोबर ज्याप्रकारचे व्यवहार राहिला आहे, ज्या प्रकारे खालच्या स्तरावर जाऊन ते सध्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करतात, या सगळ्या गोष्टींनी आमची मनं दुखावली गेली आहेत. जिथे मनं दुखावतात तिथे युती होत नाही. राजकीय मतभेद असतील तर ते दूर करून युती होते. परंतु, जिथे मनं दुरावलेली असतात,दरम्यान, फडणवीस यांनी यावेळी भाजपा आणि मनसेच्या युतीच्या चर्चांवरही भाष्य केलं. ते म्हणाले, आगामी काळात मनसे कुठे असेल, कोणाबरोबर असेल ते वेळच सांगेल. आमची निश्चितपणे राज ठाकरे यांच्याशी मैत्री आहे.

# जॉनी लिवर यांनी केला मोठा खुलासा



१९९३ साली 'बाजीगर' हा चित्रपट प्रदर्शित झाला आणि सुपरहिट ठरला. 'बाजीगर'मधील शाहरुख खानने साकारलेली खालनायकाची भूमिका आजही चित्रपटसृष्टीतील त्याच्या करिअरचा एक महत्त्वाचा टप्पा मानली जाते. त्यावेळी चित्रपटसृष्टीत नवीन असलेल्या शाहरुखसाठी ही भूमिका साकारणे एक मोठे आव्हान होते. परंतु ही नकारात्मक भूमिका साकारत तो एक चतुरस्त्र अभिनेता आहे हे त्याने सगळ्यांसमोर सिद्ध केले. या चित्रपटात शाहरुखच्या कामाचं तर कौतुक झालंच, पण याबरोबरच इतरही कलाकार भाव खाऊन गेले. काजोलचं काम लोकांनी डोक्यावर घेतलं, या चित्रपटातून शिल्पा शेट्टीने चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं.

# सिद्धार्थ मल्होत्राच्या 'योद्धा' चित्रपटाचं पोस्टर

सिद्धार्थ मल्होत्रा हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीचा अभिनेता असून त्याचा आगामी चित्रपट 'योद्धा' १५ मार्च रोजी प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाबद्दल प्रेक्षकांची उत्सुकता वाढण्यासाठी निर्मात्यांनी चांगलीच तयारी केली जात आहे. 'योद्धा' चित्रपटाचे पोस्टर अनोख्या पद्धतीने सादर करण्यात आले. 'योद्धा' च्या टीमने हे पोस्टर हॅलिकॉप्टरच्या मदतीने हवेत लाँच केले. सागर आंब्रे आणि पुष्कर ओझा दिग्दर्शित हा ॲक्शन-थ्रिलर चित्रपट अनेक अडथळ्यांचा सामना केल्यानंतर आता १५ मार्च रोजी प्रदर्शित होणार आहे. सिद्धार्थ मल्होत्राची मुख्य भूमिका असलेल्या 'योद्धा' चित्रपटाचे पोस्टर लाँच करण्यात आले. हॅलिकॉप्टरच्या साहाय्याने हवेत उंच ठिकाणाहून हे पोस्टर लाँच करण्यात आले. या पोस्टर-लाँचचा व्हिडीओ सिद्धार्थने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केला आणि कॅप्शन दिले, "थेट तुमच्या स्क्रीनवर थ्रिल एअरड्रॉप! तुमच्यासह हा प्रवास अनुभवताना मी खूप आनंदी आहे. "टीझर रिलीजची तारीख शेअर करत त्याने पुढे लिहिले, "योद्धाचा टिझर १९ फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे. योद्धा १५ मार्च राजी सिनेमागृहात प्रदर्शित होईल." 'योद्धा' हा पहिलाच हिंदी चित्रपट ठरला ज्याचे अशा अनोख्या पद्धतीने पोस्टर लाँच करण्यात आले. दरम्यान, या चित्रपटाबद्दल सांगायचं झालं तर, या ॲक्शन-थ्रिलर चित्रपटात सिद्धार्थ मल्होत्रासह दिशा पटानी आणि राशी खन्ना प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत.

# सोनालीचे तिखट भाष्य



मराठी सिनेसृष्टीत आपले वेगळं स्थान निर्माण करणारी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी सध्या चर्चेत आहे. सोनाली सध्या दाक्षिणात्य चित्रपटात काम करत आहे. अभिनयासोबत आपल्या सडेतोड मतांसाठी सोनाली चर्चेत आली होती. आता पुन्हा एकदा तिने सडेतोड भाष्य केले आहे. एखाद्या पुरुष कलाकाराने यश मिळवले की त्याची मेहनत आहे असे म्हणतात. मात्र, स्त्रीचे हे यश हे नेहमी इतरांचे उपकार असल्याचे दर्शवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे सोनाली कुलकर्णीने म्हटले. सोनाली कुलकर्णी ही मल्याळम चित्रपट 'मलायकोट्टाई वालीबान'या चित्रपटात काम करत आहे. या चित्रपटात दाक्षिणात्य सुपरस्टार मोहनलालप्रमुख भूमिकेत आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने सोनाली कुलकर्णीने 'नवभारत टाइम्स'सोबत संवाद साधला. त्यावेळी तिने आपली सडेतोड मते व्यक्त केली.सोनालीने एका प्रश्नाला उत्तर देताना म्हटले की, जेव्हा एक मुलगी स्वत: घर, कार खरेदी करते किंवा ती एखादी गोष्ट आपल्या मेहनतीने साध्य करते तेव्हा तिच्याकडे वेगळ्या नजरेने पाहिले जाते. एखाद्या राजकारण्याने भेट दिली असेल, एखाद्या निर्मात्याने ती दिली असेल, कदाचित ती विशेषाधिकाराने मिळाली असेल म्हटले जाते. जेव्हा एखादी स्त्री मिळवते तेव्हा तिला विशेषाधिकार म्हणतात आणि जेव्हा तोच पुरुष मिळवतो तेव्हा ते त्याचे यश असल्याचे म्हटले जाते.

# 'श्री'; चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख

राजकुमार राव बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक आहे. त्याने आतापर्यंत अनेक वैविध्यपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. स्त्री, न्यूटन या चित्रपटांमधील त्याच्या भूमिका चांगल्याच गाजल्या. आता लवकरच त्याचा 'श्री' (SRI) चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, 'SRI' बाबत मोठी माहिती समोर आली आहे.'श्री' चित्रपटाची घोषणा झाल्यापासून प्रेक्षक या चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेची वाट पाहत होते. आता प्रेक्षकांची प्रतीक्षा संपली आहे. 'श्री' येत्या १७ मे रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट उद्योगपती श्रीकांत बोला यांच्या आयुष्यावर आधारित आहे. त्यामध्ये राजकुमार रावबरोबर अभिनेता ज्योतिका, अलाया एफ व शरद केळकर यांच्याही प्रमुख भूमिका आहेत.तुषार हिरानंदानी या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत; तर भूषण कुमार, कृष्ण कुमार व निधी परमार यांनी त्याची निर्मिती केली आहे. सुरुवातीला हा चित्रपट या वर्षी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्रदर्शित होणार होता; मात्र तारखेत बदल करण्यात आला असून, तो त्याच महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात प्रदर्शित करण्यात येणार आहे. टी-सीरिजच्या अधिकृत इन्स्टाग्राम हँडलवरून याबाबत एक पोस्टही शेअर करण्यात आली आहे. पोस्टमध्ये राजकुमार रावचा फोटो शेअर करण्यात आला आहे. ही पोस्ट शेअर करीत कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, श्रीकांत बोला यांच्या अविस्मरणीय जीवनप्रवासावर आधारित 'श्री' चित्रपट १७ मे २०२४ रोजी प्रदर्शित होणार आहे.राजकुमार राव बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक आहे. राजकुमार राव बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक आहे. त्याने आतापर्यंत अनेक वैविध्यपूर्ण भूमिका साकारल्या आहेत.

# रकुल प्रीत, जॅकी भगनानीचे खास लूक



अभिनेत्री रकुल प्रीत सिंग व अभिनेता जॅकी भगनानी सध्या मोठ्या प्रमाणात चर्चेत आहेत. येत्या २१ फेब्रुवारीला दोघे गोव्यात लग्नबंधनात अडकणार आहेत. गोव्यात त्यांच्या लग्नसोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. नातेवाईक व जवळच्या मित्र-परिवाराच्या उपस्थितीत हा लग्नसोहळा पार पडणार आहे. दोघांच्या घरात लग्नाआगोदरच्या कार्यक्रमांनाही सुरुवात झाली आहे. दरम्यान, रकुल व जॅकी लग्नात कोणत्या प्रकारचे कपडे घालणार याबाबत मोठी माहिती समोर आली आहे.हिंदुस्तान टाइम्सने दिलेल्या माहितीनुसार, रकुल व जॅकी पर्यावरणस्नेही पद्धतीने लग्न करणार आहेत. दोघांनी आपल्या लग्नात नो-क्रॅकर पॉलिसी पर्यायाचा अवलंब केला आहे. लग्न समारंभानंतर हे जोडपे वृक्षारोपणही करणार आहे. रकुल व जॅकीच्या कुटुंबीयांनी कोणत्याही पाहुण्यांना निमंत्रण पत्रिका दिलेली नाही. दोघांनी नातेवाइकांपासून मित्र-परिवारापर्यंत प्रत्येकाला ई-इन्व्हिटेशन पाठवले आहे.मिळालेल्या माहितीनुसार- रकुल व जॅकी आपल्या लग्नात एकदम खास लूक करणार आहेत. दोघे लग्नाच्या प्रत्येक कार्यक्रमात एक दोन नव्हे, तर पाच डिझायनरचे कपडे परिधान करणार आहे. मेंदी, संगीत, सप्तपदी, रिसेप्शन यांसारख्या वेगवेगळ्या कार्यक्रमात दोघे वेगवेगळ्या डिझायनरचे कपडे घालणार आहेत. त्यामध्ये सेलिब्रिटी डिझायनर तरुण ताहिलियानी, शंतनू, निखिल, फाल्गुनी शेन पीकॉक, कुणाल रावल व अर्पिता मेहता यांसारख्या प्रसिद्ध डिझायनरचा समावेश आहे. रकुल तिच्या मेंदी कार्यक्रमात परिधान करणाऱ्या पोशाखावर फुलकरी भरतकाम करून घेणार आहे.गोव्यात लग्न केल्यानंतर रकुल व जॅकी हनिमूनला कुठे जाणार याबाबत चाहत्यांना उत्सुकता लागली आहे. बॉम्बे टाइम्सने दिलेल्या माहितीनुसार, रकुल व जॅकीने लग्नानंतर हनिमूनला जाण्याची योजना रद्द केली आहे. कारण- व्यग्र वेळापत्रकामुळे दोघे लग्नानंतर काही दिवसांमध्ये कामावर परतणार आहेत.ऑक्टोंबर २०२१ मध्ये रकुल व जॅकीने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत आपल्या रिलेशनशिपबाबत घोषणा केली होती. दोघांच्या कामाबाबत बोलायचे झाल्यास, जॅकी लवकरच 'बडे मिया छोटे मिया' चित्रपटात दिसणार आहे. यामध्ये त्याच्याबरोबर अक्षय कुमार व टायगर श्रॉफ मुख्य भूमिका आहे. तर रकुल प्रीत सिंग नितेश तिवारी यांच्या 'रामायण' चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात ती शूर्पणखाची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटात अभिनेता रणबीर कपूर रामाची व साऊथची सुपरस्टार साई पल्लवी सीतेची भूमिका साकारणार आहे.

# सर्फराझ खान भारतासाठी खेळणार!

## विश्रांतीनंतर भारत आणि इंग्लंडचे संघ पुन्हा एकमेकांसमोर

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**राजकोटच्या निरंजन शहा मैदानावरची कुंद सकाळ. दहा दिवसांच्या विश्रांतीनंतर भारत आणि इंग्लंडचे संघ पुन्हा एकदा एकमेकांसमोर उभे ठाकणार होते. नौशाद खान आणि त्यांच्या सुनेसाठी मात्र ही सकाळ हुरहूर वाढवणारी होती. जे स्वप्न उराशी बाळगलं, जे स्वप्न दूर जात राहिलं, काहीक्षणी तर ते स्वप्नच राहणार असं वाटलं ते स्वप्न प्रत्यक्षात साकारणार होतं. त्यांचा मुलगा सर्फराझ खानला माजी क्रिकेटपटू अनिल कुंबळे यांच्या हस्ते भारताची कॅप देण्यात आली. सर्फराझ भारताचा ३११वा क्रिकेटपटू झाला.**



ती कॅप सर्फराझच्या डोक्यावर विराजमान होताच नौशाद आणि सर्फराझची पत्नी रोमाना झहूर यांच्या डोळ्यातून अश्रूंचा बांध फुटला. सर्फराझने संघातल्या सहकाऱ्यांची गाठभेट घेतली आणि तो वडील आणि पत्नीच्या दिशेने झेपावला. कोच आणि वडील अशा दोन्ही भूमिका निभावणाऱ्या नौशाद यांच्या डोळ्यातले अश्रू त्याने पुसले. नंतर पत्नीच्या डोळ्यातले अश्रू पुसले. दोघांना कडकडून मिठी मारली. आपला मुलगा आता भारताचा झाला आहे याचं अतीव समाधान नौशाद यांच्या देहबोलीत होतं. भरकटू पाहणारं एक स्वप्न आता सत्यात उतरलं होतं. सर्फराझ खानचं पदार्पण ही केवळ एक भावनिक घटना नाही. एका तरुण मुलाला लहान वयात नियतीने फिरवून आणलेल्या रोलरकोस्टरची सफर आहे. कमकुवत हृदयाच्या मंडळींना या सफरीचा वेग कदाचित झेपणार नाही. आशानिराशेचे हिंदोळे तुम्हाला भेलकांडून टाकतील पण तरी तुम्ही ही गोष्ट अनुभवायला हवी.नौशाद आणि कुटुंबीय मूळचे उत्तर प्रदेशतल्या आझमगढचे. मुंबानगरीत येऊन स्थायिक झाले. प्रचंड गर्दीसाठी प्रसिद्ध अशा कुर्ल्यात सर्फराझचं बालपण गेलं. मुंबईत माणसाला राहायलाच मुळात पुरेशी जागा नाही. त्यामुळे खेळायला मैदानं मोजकीच. पण जी काही मैदानं आहेत तिथे सर्फराझने आपल्या बॅटची ताकद दाखवून दिली आहे. २००९ मध्ये मुंबईतल्या क्रीडा जगतात सर्फराझ खान हे नाव चमकलं. निमित्तही तसं होतं. १२ वर्षांच्या सर्फराझने मुंबईतल्या प्रतिष्ठेच्या हारिस शिल्ड स्पर्धेत ४३९ धावांची मॅरेथॉन खेळी केली होती. सचिन तेंडुलकरचा ३४६ धावांचा विक्रम मोडल्याने सर्फराझच्या नावाला वलय प्राप्त झालं. आपल्या कामगिरीइतकंच त्याचं परिमाणही महत्त्वाचं असतं. आझाद मैदानातलं जॉन ब्राईट क्रिकेट क्लब ही सर्फराझची कर्मभूमी. याच मैदानात शेकडो तास घाम गाळून सर्फराझने बॅटिंगची धुळाक्षरं गिरवली आहेत. वडीलच कोच असल्याने शिस्त ओघाने आलीच.दोनच वर्षात नियतीने जोरदार वळण घेतलं आणि सर्फराझचं नाव वयचोरी प्रकरणात घेतलं गेलं. सर्फराझचं वय अधिक आहे पण ते कमी दाखवण्यात आलं आहे असा आरोप झाला. हाडांची प्राथमिक चाचणी झाली, त्यात त्याचं वय अधिक असल्याचं दिसलं. उभरत्या वयातल्या मुलाला याचे परिणाम किती माहिती असतील कल्पना नाही पण घरच्यांना गांभीर्य कळलं. सुदैवाने प्रगत चाचणी झाली, त्यात सर्फराझचं वय जेवढं कागदोपत्री होतं तितकंच असल्याचं स्पष्ट झालं. या काळात मानसोपचारतज्ज्ञांची मदत घेण्यात आली. धावा होत होत्या, प्रसिद्धी मिळत होती. डोक्यात हवा जाण्याचा हा काळ असतो. युकेमध्ये शिबीर आटोपून परतलेल्या १२वर्षांच्या सर्फराझला एमसीएच्या कॅम्पमधून बाहेर करण्यात आलं. २०१४ मध्ये सर्फराझने U19 वर्ल्डकपमध्ये आपल्या बॅटची ताकद दाखवली. मात्र पुढच्याच वर्षी २०१५ मध्ये U19 चॅम्पियनशिपच्या मॅचदरम्यान निवडसमिती सदस्यांच्या दिशेने आक्षेपार्ह हावभाव केल्याने सर्फराझवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली. काही दिवसांनंतर मुंबई रणजी संघातूनही त्याला डच्चू देण्यात आला. ट्वेन्टी२० प्रकारात जगभरात प्रसिद्धीस पावलेला सूर्यकुमार यादव आणि सर्फराझ यांच्या मॅच फी रोखण्यात आल्या होत्या. सर्फराझच्या बाबतीत यशापयश, आशानिराशा, एल खेळला. या स्पर्धेत खेळणारा सगळ्यात लहान वयाचा खेळाडू ठरला.

### सर्फराझ खेळण्यासाठी फिट

मुंबईत गोष्टी मनासारख्या होत नसल्याने सर्फराझने उत्तर प्रदेश संघाकडून खेळण्याचा निर्णय घेतला. त्यानेही फार काही साधलं नाही आणि सर्फराझ मुंबईकडे परतला. मुंबईकडून खेळण्यासाठी पुन्हा पात्र ठरण्यासाठी त्याला कूलिंग ऑफ पीरियड पार करावा लागला. त्याकाळात वडिलांबरोबर त्याने बॅटिंगवर कसून काम केलं. २०१९-२० हंगामात सर्फराझने मुंबईकडून खेळताना त्रिशतकी खेळी केली. गावस्करांचे शब्द होते, ‘सर्फराझ १००च्या सरासरीने डोमेस्टिक क्रिकेटमध्ये धावा करतो आहे. त्याला भारतीय संघात स्थान मिळायला हवं. सर्फराझ क्रिकेट खेळण्यासाठी फिट आहे.

---

# रवींद्र जाडेजाच्या शतकानं सरफराजचा घात

## सर्फराज आणि जाडेजाकडून धाव घेण्याचा प्रयत्न फसला

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंडदरम्यान (कसोटी मालिकेतील तिसरा सामना राजकोटच्या मैदानावर खेळवण्यात येत आहे. सामन्याच्या पहिल्या दिवशी कर्णधार रोहित शर्मानि शतकी खेळी केलीये. भारतीय संघ अडचणीत असताना मैदानात उतरलेल्या रोहितने 131 धावांची खेळी केली. त्याने 14 चौकार आणि 3 षटकार लगावले.**

दरम्यान, रोहित शर्मांचा एक वेगळाच फोटो सोशल मीडियावर व्हायरल झालाय. राजकोट कसोटीतून सर्फराज खानने पदार्पण केले. पहिल्याच सामन्यात त्याने 9 चौकार आणि 1 षटकार लगावत 66 चेंडूमध्ये 62 धावा ठोकल्या. राजकोटच्या तिसऱ्या कसोटीत कर्णधार रोहित शर्मानि नाणेफेक जिंकल्यानंतर प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. त्यानंतर फलंदाजीसाठी मैदानात उतरलेल्या टीम इंडियाने पहिल्या दिवसअखेर 5 बाद 326 धावा केल्या आहेत. सलामीवीर यशस्वी जयस्वाल, शुभमन गिल आणि नवख्या रजत पाटीदारला मोठी कामगिरी करता आली नाही. सर्फराज खानने पदार्पणातच दमदार कामगिरी केली. मात्र, ज्या पद्धतीने सर्फराज धावबाद झाला,ते पाहून रोहित शर्मा रागाने लाल झालेला पाहायला मिळाला. ड्रेसरुममध्ये त्याचा राग दिसून येत होता. यावेळी रोहितने त्याची टोपीही फेकून दिली. दरम्यान, रोहितचा हा व्हिडीओ सोशळ मीडियावर तुफान व्हायरल होताना दिसतोय. यावर सोशल मीडिया लाईक आणि कमेंट्सचा पाऊस पडलाय. रवींद्र जाडेजा 99 धावांवर फलंदाजी करत होता. यावेळी सर्फराज आणि जाडेजाकडून धाव घेण्याचा प्रयत्न फसला. त्यामुळे आक्रमकपणे फटकेबाजी करणारा सरफराज धावबाद होऊन तंबूत परतला. त्याने दरम्यान, रवींद्र जाडेजा 99 धावांवर असताना, एक चोरटी धाव घेण्याच्या प्रयत्नात जाडेजाचा कॉल फसला, त्यामुळे तुफान फॉर्ममध्ये खेळत असलेला सरफराज धावबाद झाला. सरफराजने 62 धावा केल्या. पहिल्याच सामन्यात त्याने 9 चौकार आणि 1 षटकार लगावत 66 चेंडूमध्ये 62 धावा ठोकल्या.




### रवींद्र जाडेजाचं शतक

‘रवींद्र जाडेजाने घरच्या मैदानावर शतकी खेळी केली. भारताने लवकर विकेट्स गमावल्यानंतर त्याने रोहितसोबत मोठी भागिदारी रचली. पहिल्या डावात त्याने कारकिर्दीतील चौथे शतक ठोकले. रवींद्र जाडेजाने 212 चेंडूत 110 केल्या असून तो पहिल्या दिवसअखेर नाबाद राहिला आहे. सर्फराज खानने पदार्पणातच दमदार कामगिरी केली. मात्र, ज्या पद्धतीने सर्फराज धावबाद झाला,ते पाहून रोहित शर्मा रागाने लाल झालेला पाहायला मिळाला. ड्रेसरुममध्ये त्याचा राग दिसून येत होता. यावेळी रोहितने त्याची टोपीही फेकून दिली. दरम्यान, रोहितचा हा व्हिडीओ सोशळ मीडियावर तुफान व्हायरल होताना दिसतोय. यावर सोशल मीडिया लाईक आणि कमेंट्सचा पाऊस पडलाय.